# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.02.2025** **वार- मंगळवार**

---

**जय शिवाजी जय भारत**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त उद्या पुण्यासह संपूर्ण राज्यात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्या पुण्यात, जय शिवाजी जय भारत, पदयात्रा काढण्यात येणार आहे. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह राज्याचे मंत्री आणि 20हजार माय भारत स्वयंसेवक या पदयात्रेत सहभागी होणार आहेत. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत ही पदयात्रा जाईल. राज्यातल्या सर्व 36 जिल्ह्यांमध्येही उद्या एकाच वेळी अशा प्रकारच्या पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

**उद्घाटन**

पुण्यातल्या आंबेगाव ब्रुद्रुक इथं साकारत असलेल्या शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पणही उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. प्रतापगडावरच्या भवानी मातेच्या मंदिराची प्रतिकृती असलेल्या तुळजा भवानी मातेचं मंदिर शिवसृष्टीच्या या टप्प्यात साकारण्यात आलं आहे.

**शिवजयंती**

पुण्यातील शिवजयंती महोत्सव समितीतर्फे दर वर्षीप्रमाणे यंदाही शिवजयंतीनिमित्त उद्या सकाळी नऊ वाजता लालमहाल इथून शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ मिरवणूक काढण्यात येणार आहे. स्वराज्यरथ, ढोलताशा पथकं तसंच शिवकालीन युद्धकला सादर करणाऱ्या 51 रणरागिणी यात सहभागी होणार आहेत.

**साहित्य यात्री संमेलन**

दिल्लीत होणाऱ्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभागी होणाऱ्या साहित्य रसिकांसाठी पुणे ते दिल्ली महादजी शिंदे एक्सप्रेस विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून दिली जाणर आहे. ही विशेष रेल्वे उद्या दुपारी दोन वाजता पुण्यातून निघेल आणि 20 फेब्रुवारी रोजी रात्री दिल्लीत पोहोचेल. रेल्वे प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवरचं ‘मराठी साहित्ययात्री संमेलन’ होणार आहे. रेल्वेमध्ये होणारं हे मराठीतलं पहिलंच संमेलन असेल. रेल्वेच्या प्रत्येक डब्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची नावं दिली जाणार आहेत. मराठी भाषामंत्री उदय सामंत या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून लेखक शरद तांदळे संमेलनाध्यक्ष तर लेखक वैभव वाघ संमेलनाचे कार्यकारी अध्यक्ष आहेत.

राज्यातल्या विविध गावा-गावांतील साहित्यिक, युवक, लोककलाकार, शाहिरी आणि भजनी मंडळ यात सहभागी होणार आहेत.

**<u>रक्षा खडसे</u>**

ई-स्पोर्ट्स हे आधुनिक काळात क्रीडा क्षेत्रातील नवं कौशल्यपूर्ण करिअर ठरू शकतं, त्यामुळे युवकांनी ई स्पोर्ट्सकडे नवा क्रीडाप्रकार म्हणून पहावं, असं प्रतिपादन केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज पुण्यात केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठामध्ये ई स्पोर्ट्स खुल्या अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर फाऊंडेशन रुग्णालय आणि वैद्यकीय संशोधन केंद्राला नाल्यावरील पुलाच्या बांधकामासाठी जमीन नाममात्र दराने वार्षिक भाडेपट्ट्याने देण्यासाठी आज राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या पुलाच्या बांधकामाचा खर्च फाऊंडेशन करणार आहे.

**<u>एचएसआरपी</u>**

2019 पूर्वीच्या सर्व वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' म्हणजे 'एचएसआरपी' बसवणं बंधनकारक आहे. पुण्यात 'एचएसआरपी' बसवण्यासाठी 69 केंद्र स्थापन केली असून mhhsrp.com या लिंकवर ऑनलाइन नोंदणीही करता येणार आहे.

**<u>जीबीएस</u>**

गुलेन बॅरी सिंड्रोमच्या उगमाचा आणि प्रसाराचा शोध घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागानं सिंहगड रस्त्यावरील कुक्कुटपालन केंद्रांमधील 106 नमुने संकलित केले होते. राष्ट्रीय विषाणू विज्ञान प्रयोगशाळेनं या नमुन्यांच्या तपासणीचा अहवाल पशुसंवर्धन विभाग आणि महापालिकेच्या आरोग्य विभागाला सुपूर्द केला आहे. त्यानुसार, 23 नमुन्यांमध्ये कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी आणि 5 नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस आढळून आले असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य प्रमुख, डॉक्टर निना बोराडे यांनी दिली.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेचं 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचं अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी 21 फेब्रुवारी रोजी विशेष सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यामध्ये हे अंदाजपत्रक सादर करणार आहेत.

**<u>पवनाथडी</u>**

महिला बचतगटांनी तसंच वैयक्तिक महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना विपणन कौशल्य माहीत व्हावीत, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं पवनाथडी जत्रेचं

आयोजन केलं आहे. येत्या 21 ते 24 फेब्रुवारी या कालावधीत सांगवीच्या पी. डब्ल्यू. डी मैदानात ही जत्रा होणार आहे.

**पुणेमनपा**

पुणे शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करून वाहतुकीचा वेग वाढविण्यासाठी पुणे महापालिकेने आता नव्याने 17 रस्त्यांची निवड केली आहे. त्याअंतर्गत 'मिशन 17' हाती घेतलं असून, या रस्त्याची कामं जलद गतीने होणार आहेत, अशी माहिती पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल 36 तर किमान 15 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये विविध भारतीच्या पुणे केंद्रांवर नमस्कार.**